# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२

E-mail :- desk1@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in


गोपनीय

क्र.: १(२)/तंशिसं/कार्य.अह./महापार प्रणाली/२०१९-२०/२०८

दिनांक : 25 SEP 2019

१. सहसंचालक
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

विषय : गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील शासकीय अधिका-यांचे **कार्यमूल्यमापन अहवाल** महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने लिहिण्याबाबत ....

संदर्भ : सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय -

१. क्र.सीएफआर १२१७/प्र.क्र.१३१/तेरा, दि.१५ डिसेंबर,२०१७

२. क्र.सीएफआर १२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. ६ जून, २०१८

उपरोक्त विषया संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भिय शासन निर्णयाचे कृपया अवलोकन करावे. (शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवरुन उपलब्ध करुन घेण्यात यावा.) सदर शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ पासून सर्व गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिका-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल शासनाच्या महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले होते. त्याकरीताची कार्यपध्दती संदर्भिय शासन निर्णयामध्ये विषद करण्यात आलेली आहे. त्यानुसार आपण आपल्या विभागीय कार्यालयातील तसेच विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थांत कार्यरत सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिका-यांची परिशिष्ट-ड मध्ये माहिती यापूर्वी संचालनालयास सादर केलेली होती. मात्र शासनाच्या संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ ची कार्यवाही ऑफलाईन पध्दतीने करण्याबाबतच्या सूचना शासन स्तरावरुन प्राप्त झाल्यामुळे ऑनलाईन पध्दतीने करावयाची कार्यवाही तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्यात आलेली होती हे आपणांस विदितच आहे.

आता शासन स्तरावरुन प्राप्त झालेल्या निर्देशानुसार शासकीय संस्थांत कार्यरत सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिका-यांच्या कार्यमूल्यमापन अहवालाची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने करावयाची असल्यामुळे आपल्या विभागीय कार्यालयात व विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थांमध्ये **दि. ३१/८/२०१९** रोजी आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिका-यांची माहिती शासन निर्णयात दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार **परिशिष्ट-ड** मध्ये भरुन संचालनालयास **दि. ३/१०/२०१९** पर्यंत पाठविण्यात यावी. त्याचप्रमाणे सदर माहिती संचालनालयाचे अतिरिक्त परिरक्षक यांच्या pa.naik@gov.in या ई-मेल आयडीवर देखील पाठविण्यात यावी. तसेच ज्या राजपत्रित अधिका-यांची नव्याने नियुक्ती झालेली आहे, त्यांचे बाबतीत देखील शासनाच्या दि. १५/१२/२०१७ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करुन अद्ययावत माहिती संचालनालयास उपलब्ध करुन देण्यात यावी. याबाबतच्या पुढील कार्यवाहीबाबत अन्य कांही सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून प्राप्त होताच त्यानुसार आपणांस अवगत करण्यात येईल.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक, तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

संचालनालयातील कार्यासन अधिकारी, कार्या.क्र. ४ .... त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करुन त्यामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार संचालनालयातील सर्व गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिका-यांच्या कार्यमूल्यमापन अहवालाची कार्यवाही सुरळीत पार पाडण्याकरीता संबंधीत अधिका-यांची परिशिष्ट-ड मध्ये माहिती **दि. ३/१०/२०१९** पर्यंत भरुन तयार ठेवावी.

C:\Users\desk1\Desktop\EMD Data\ऑनलाईन महापार प्रणाली.docx

---

जा. क्र. : तंशिविकापु/लले/कामूअ/२०१९/ 2473
दिनांक : ०१/११/२०१९.

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय संस्था / कार्यालय प्रमुख.

त्यांना कळविण्यात येते की, मुख्य कार्यालयाच्या संदर्भित पत्रात सूचित केल्यानुसार आपल्या संस्थेतील कार्यरत सर्व गट अ व गट ब (राजपत्रित) अधिका-यांच्या कार्यमूल्यमापन अहवालाची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने करावयाची असल्याने आपल्या संस्थेत दिनांक ३१/०८/२०१९ रोजी आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व गट अ व गट ब (राजपत्रित) अधिका-यांची माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्ट ड मध्ये भरुन **दिनांक ०२/११/२०१९** पर्यंत या कार्यालयाच्या ropune@dtemaharashtra.gov.in या ई मेल ॲड्रेसवर सादर करावी.

प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र संस्थांना ई मेल द्वारे पाठविण्यासाठी / या कार्यालयाच्या संकेतस्थळावर

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र:सीएफआर-१२१७/प्र.क्र.१३१/१३ दि.१५/१२/२०१७ सोबतचे परिशिष्ट "ड"

| S. No | Employee code (Sevaarth ID) | Appellation (Shri./Smt/Ms) | Official Name | Gender | Father`s / Husband`s Name | Date Of Birth (Format DD-MM-YYYY) | nationality | Religion | Aadhar Number | Nic Email ID | Mobile No* | Department Name | Name of Service | Organisation Unit (OU) | Cadre | Designation | Type of Appointment | Appointment Date in the present Cadre (Format DD-MM-YYYY) | Allotment Year (First Appointment ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र:सीएफआर-१२१७/प्र.क्र.१३१/१३ दि.१५/१२/२०१७ सोबतचे परिशिष्ट "इ"

Name of Service -

Name of OU-

Primary Custodian / Alternate Custodian / Mahapar Manager

| S. No | Employee code (Sevaarth ID) | Appellation (Shri./Smt/Ms) | Official Name | Gender | Father`s / Husband`s Name | Date Of Birth (Format DD-MM-YYYY) | nationality | Religion | Aadhar Number | Nic Email ID | Mobile No* | Department Name | Name of Service | Organisation Unit (OU) | Cadre | Designation | Type of Appointment | Appointment Date in the present Cadre (Format DD-MM-YYYY) | Allotment Year (First Appointment ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

* Mobile no. should be linked with Aadhar No. to facilitate eSign in MahaPAR